# मेट्रो-३ फलाटांवर काचेचे दरवाजे

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

कारडेपोचा प्रश्न निकालात निघाल्यापासून मेट्रो ३ च्या कामाला गती मिळाली आहे. बोगद्यांची कामे जवळपास संपली असून स्थानक उभारणीची कामेही प्रगतीपथावर आहेत. आता फलाटावर काचेचे दरवाजे उभारण्याची कामे सुरु झाली आहेत.

काचेच्या दरवाजांमुळे होणारे संभाव्य मानवी अपघात टळतील. जोवर गाडी फलाटात येत नाही, तोपर्यंत हे दरवाजे उघडले जाणार नाहीत. गाडी आल्यानंतरच दरवाजे उघडले जातील. गाडी आली की नाही हे पाहण्यासाठी अनेकदा प्रवासी वाकून बघतात, काही प्रवासी अगदी फलाटाच्या टोकावर उभे



राहतात, लक्ष नसल्याने गाडी आल्याचे त्यांना कळत नाही, परिणामी अपघात होतात. अनेकदा फलाटावरून खाली उडी मारून धावत्या गाडीखाली आत्महत्या करण्याचे प्रकारही घडतात. उपनगरीय रेल्वेवर असे अनुभव अनेकदा आले आहेत. हे प्रकार टाळण्यासाठी मेट्रोत प्लॅटफॉर्म स्क्रीन डोअर्स ही यंत्रणा उभारली जात आहे. त्यामुळे संभाव्य अपघात रोखता येतील.

प्रवाशांना गाडी आणि फलाट यामधील अंतरापासून दूर ठेवण्याकरिता अतिरिक्त सुरक्षरक्षक तैनात करावे लागतात. मेट्रो १ मार्गावर शा प्रकारे सुरक्षा रक्षक आहेत. फलाटावरील काचेच्या दरवाजांमुळे या रक्षकांवरील ताण कमी होईल आणि त्यांच्या संख्येतही कपात करता येईल. ट्रेन आल्यानंतर आधी फलाटावरील काचेचे दरवाजे उघडतील, त्यानंतर ट्रेनचे दरवाजे उघडतील. मग प्रवाशांना ट्रेनमध्ये प्रवेश करता येईल. ट्रेनचे दरवाजे बंद झाल्यानंतर फलाटावरील काचेचा दरवाजाही बंद होईल.